**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२**

---

**क्र.टिपीएस-१८२१/प्र.क्र.१०३/२०२१/नवि-१३** **दि.०२/०८/२०२१**

**प्रस्तावना :-** शासनाने दि.०२.१२.२०२० रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर केली असून ती दि.०३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे. सदर नियमावली उक्त अधिसूचनेत नमूद क्षेत्र वगळता राज्यातील सर्व प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्राकरिता लागु आहे. सदर नियमावलीतील विनियम २.२.१४(ii) हा Fire Infrastructure Charges बाबत असून यामध्ये These charges shall be decided by the Government from time to time अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ हा महाराष्ट्र राज्यासाठी दि.०६.१२.२००८ पासून लागु करण्यात आला आहे. या अधिनियमामध्ये अग्निशमन सेवेच्या अनुषंगाने वसूल करावयाचे शुल्क, त्यामध्ये वाढ अथवा घट करणे, असे शुल्क स्वतंत्र निधीमध्ये ठेऊन त्याचा विनियोग कशाप्रकारे करावा याबाबत सविस्तर तरतुदी करण्यात आल्या आहेत.

उक्त अधिनियम संपूर्ण राज्यासाठी लागू झाला असल्याने त्यातील तरतुदी व त्यानुसार आकारावयाचे शुल्काची मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये Fire Infrastructure Charges बाबत करण्यात आलेल्या तरतुदीमधे पुनरावृत्ती होत असल्याचे शासनाच्या निर्दशनास आले असल्याने मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम २.२.१४(ii) मधील तरतुदीच्या अनुषंगाने आकारावयाच्या Fire Infrastructure Charges बाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

***आदेश***

मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम २.२.१४(ii) मधील तरतुदीनुसार Fire Infrastructure Charges ची आकारणी वेगळ्याने करण्याची आवश्यकता नाही. मात्र महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसुरक्षा अधिनियम, २००६ मधील तरतुदींनुसार आवश्यक ती फी / शूल्क आकारणी करण्यात यावी व त्याचा विनियोग सदर अधिनियमातील तरतुदींनुसार करण्यात यावा.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

(किशोर गोखले)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उप मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.